# नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३८ /२०२५ दि. १४/१०/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी**, **नौपाडा** वाहतूक उप विभागाचे हद्दीत तिन पेट्रोलपंप कडून गजानन महाराज चौक कडे जाणारा विर सावरकर मार्ग हा येवले चहा समोरील चौका पासुन गजानन महाराज चौक पर्यत सर्व प्रकारच्या वाहनांकरीता खुला आहे. येणाऱ्याकाळा मध्ये सण उत्सवामुळे बाजारपेठेत मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होण्याची शक्यता नाकाराता येत नाही. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी तिन पेट्रोलपंप समोरुन गजानन महाराज चौक कडे जाणाऱ्या विर सावरकर रोड हा सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकी करीता **NO ENTRY** करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए./११६/सीआर/३७/टीआर,दि.२७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद** | **१)** आराधना टॉकीज कडुन गजानन महाराज चौक कडे जाणाऱ्या सर्व दुचाकी, रिक्षा, चारचाकी वाहने तसेच टिएमसीच्या बसेस व खाजगी बसेस, ४०७ टेंम्पो व त्यावरील सर्व जड/अवजड वाहनांना **तिन पेट्रोलपंप समोर** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.<br>**२)** वंदना टॉकीज कडुन **तिन पेट्रोलपंप मार्गे** गजानन महाराज चौक कडे जाणाऱ्या सर्व दुचाकी, रिक्षा, चारचाकी वाहने तसेच टिएमसीच्या बसेस व खाजगी बसेस, ४०७ टेंम्पो व त्यावरील सर्व जड/अवजड वाहनांना **तिन पेट्रोलपंप समोर "प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग** | सदरची वाहने तिन पेट्रोलपंप समोरुन यु टर्न घेवुन गणपती कारखाना, हरिनिवास सर्कल किंवा डावे वळण घेवुन वंदना बस डेपो समोरुन इच्छीत स्थळी जातील. |

सदरची वाहतूक अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. .

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :— समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग/पोनि नौपाडा वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा. ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.